Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October- 2018

SPECIAL ISSUE-69

**Chief Editor :** Dr. Dhanraj Dhangar
Assist. Professor,
Dept. of Marathi,
MGV's Arts and Commerce College, Yeola
Dist. Nashik (M.S.) India.

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 450/-



Scanned with OKEN Scanner

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, Saudi Arabia.
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur [M.S.] India
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik.
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Dr. Samjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon [M.S.]
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul [M.S.]
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik [M.S.]
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon [M.S.]
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar [M.S.]
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda [M.S.]

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali** , HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**

**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF) - 0.676 (2013)
Special Issue 69 : Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
October 2018

# संत एकनाथ व त्यांची भारुडे

डॉ. [illegible]
मराठी विभागप्रमुख
श्रीमती राजकमल ना. तिडके महाविद्यालय,
मौदा, जि. नागपूर – ४४११०४
मो.नं. ९४२२८२५५५०

संत एकनाथ यांचा जन्म इ.स. १५३३ मध्ये पैठण येथे ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सूर्यनारायण आणि आईचे नाव रुक्मिणी असे होते. एकनाथ संत भानुदासांचे पणतू होते. एकनाथांच्या बालपणीच त्यांचे आईवडिल निवर्तले. त्यामुळे त्यांचे आजोबा चक्रपाणी यांनी त्यांचे संगोपन केले. वयाच्या बाराव्या वर्षी एकनाथांनी देवगिरी येथील जनार्दन स्वामींकडे जाऊन त्यांचे शिष्यत्व पत्करले. त्यांच्याकडे सहा वर्षे राहून त्यांनी संस्कृत ग्रंथांचे व ज्ञानेश्वरी सारख्या मराठी अध्यात्मग्रंथांचे अध्ययन केले. पुढे सात वर्षे त्यांनी तीर्थाटनात घालविली. तीर्थयात्रेनंतर त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला. त्यांच्या पत्नीचे नाव गिरिजा होते. त्यांना हरिपंडित नावाचा एक मुलगा व गोदा व गंगा नावाच्या दोन मुली होत्या. पंडित कवी मुक्तेश्वर हा गोदेचा मुलगा होता.

संत एकनाथांनी आपल्या आचरणातून समाज जागृती केली. मुलगा हरिपंडित हा कर्मठ व सनातनी होता म्हणून काही काळ त्याने आपल्या पित्याच्या सुधारकी आचरणाला विरोध केला. १५८३ मध्ये आळंदीस जाऊन नाथांनी ज्ञानेश्वरांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला. त्या काळात अस्पृश्यांचा स्पर्श हा विटाळ मानला जात होता. एकदा एक अस्पृश्याचे मूल घर विसरले आणि रडत रडत रस्त्यावर फिरू लागले. त्या भुकेलेल्या मुलाजवळ जाऊन नाथांनी त्याला आपल्या खांद्यावर उचलून घेतले. ते अस्पर्शाचे आहे हे माहित असूनही नाथांनी भूतदया हा खरा धर्म मानला आणि त्या मुलाला खांद्यावर घेऊन महारवाड्यात त्याच्या घरी त्याला पोचवून दिले. श्राद्धाला ब्राह्मण येईनात तेव्हा शिजवलेले अन्न त्यांनी अस्पृश्यांना खाऊ घातले. एक तहानलेले गाढव पाण्यासाठी तडफडताना त्यांनी पाहिले आणि त्याला गंगोदक पाजले. त्यांनी काम, क्रोध, इ. षड्रिपूंवर विजय मिळवला होता. एकदा ते नदीवरून आंघोळ करून परतले तेव्हा एक यवन मुलगा त्यांच्या अंगावर थुंकला. एकनाथांनी त्याच्याकडे पाहिले आणि काहीएक न बोलता नदीवर परत आंघोळीकरीता निघून गेले. ते परतत असताना तोच मुलगा त्यांच्या अंगावर परत थुंकला पण एकनाथ शिव्या न देता किंवा एक शब्दही न बोलता परत नदीवर निघून गेले. मुलाला याचे खूप आश्चर्य वाटले. नदीवरून महाराज परत येत असताना त्यांच्या शांतपणामुळे तो चिडलेला मुलगा परत त्यांच्या अंगावर थुंकला. तरी ते काहीच बोलले नाहीत आणि परत नदीवर गेले. जेव्हा ते परतले तेव्हा त्या मुलाने त्यांना साष्टांग नमस्कार घातला आणि परत परत क्षमा मागितली.

'चतुःश्लोकी भागवत' ही नाथांची पहिली रचना होय. सृष्टिमध्ये असलेल्या नारायणाचे व भागवतधर्माचे निरूपण त्यात आहे. त्यानंतर नाथांनी आध्यात्मिक स्वरूपाची काही स्फुट प्रकरणे लिहिली आहेत. त्यांनी लिहिलेले 'रुक्मिणी स्वयंवर' हे भागवत धर्मातील पहिले आख्यानक काव्य होय. श्रीकृष्ण रुक्मिणीचा विवाह म्हणजे जिवाशिवाचे मीलन अशा रूपकाभोवती हे संपूर्ण काव्य रचलेले आहे. एकनाथी भागवत हा वारकरी पंथास आधारभूत असलेला एकनाथांचा ग्रंथ होय. भागवत धर्माची परंपरा, स्वरूप, वैशिष्ट्ये, ध्येय आणि साधने यांचे विस्तृत विवेचन या ग्रंथात असल्यामुळे, त्याला या पंथाच्या धर्मग्रंथाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.



Scanned with OKEN Scanner

कथानिवेदक व अध्यात्मबोध यांचा सुरेख समन्वय या ग्रंथात आढळून येतो. नाथांनी भक्ती , विरक्ती व ईशप्राप्ती एकरूप मानली आहे. 'भावार्थ रामायण' ही त्यांची अखेरची रचना होय.

संत एकनाथांची भारुडे नुसती प्रसिध्द नाही, तर ती लोकप्रियही आहेत. ही भारुडे नीतिबोधपर आणि रूपकात्मक असल्यामुळे त्यातील काही भारुडे परीक्षांच्या अभ्यासक्रमात देखील समाविष्ट आहेत. पाखरु, गाय, विंचू, सर्प, अशा प्राण्यावर, भटीण, आंधळा, बहिरा, महारीण, गावगुंड अशा व्यक्तिविशेषांवर शिमगा, होळी अशा सणांवर, व्यापार, बाजार अशा व्यवहारावर आणि अशा कितीतरी विषयांवर रचली आहेत. 'विश्वकोश' मध्ये वसंत स. जोशी म्हणतात, ''प्राचीन मराठीतील भारुड रचनेत नवचैतन्य, विविधता व विपुलता निर्माण करण्याचे कार्य एकनाथांनीच केले. एकशेपंचवीस विषयांवर सुमारे तीनशे भारुडे त्यांनी रचली. पुरातन काळापासून मराठी बहुजन वर्गाचे आपल्या मनोरंजक व नाट्यपूर्ण गीतरचनेने रंजन करणाऱ्या गोंधळी, भराडी, वासुदेव, डोंबारी, बाळसंतोष वगैरे जमातींचा एक वर्ग होता. एकनाथांनी त्यांच्या अलिखित लोककाव्याचे पुनरुज्जीवन केले. त्यांच्या कवित्वाची व्यापकता व लौकिकता यावरुन स्पष्ट होते. आदिमाया, विंचू, जागल्या, कुडबुडया जोशी या विषयांवरील त्यांची भारुडे प्रसिध्द आहेत.''५

कोल्हाटीण :

सगुण गुणमाया। आली कोल्हाटीण खेळाया ।।धृ।।
प्रपंचाचा रोविला वेळु। चहूमूल्यांचा मांडिला खेळू।
ब्रम्ह विष्णु जयाचे बाळु। लागती पाया ।।१।।
जाला गडे निर्गुणचा कोल्हाटी । सोहं शब्दे डोलते पिटी।
चैतन्याची उचलून दृष्टी। चला जाऊ पहाया ।।२।।
कोल्हाटीण मारिती ऐसी उडी । एकवीस स्वर्गावरती भारी।
तेथे दार खिडकी उघडी । अगाध माया ।।३।।
कोल्हाटीण बसली असे डोळा । जाणे गुरुमुख विरळा।
एका जनार्दनी लीळा । जाली वर्णाया ।।४।।

एकनाथ महाराजांची ही कोल्हाटीण म्हणजे परमात्म्याची आदिशक्ती सगुण गुणमाया होय. हिलाच मूळ प्रकृती असे म्हणतात. सांख्यदर्शन व्दैतवादी आहे. त्यात प्रकृती व पुरुष हे वेगळे असल्याचे तत्वज्ञान आहे. पुरुषाचे नुसते अस्तित्वच प्रकृतीला नवनिर्मितीचे कारणभूत असते असे हे तत्वज्ञान सांगते. भागवतधर्म अव्दैतवादी आहे. परमेश्वर एकच स्वयंभू असून तोच प्रकृतीचा निर्माता होय, असे सांगतो. पण हा जो विश्वाचा पसारा आहे तो परमेश्वराने निर्माण केला नसून ही प्रकृतीची लीला होय, असे भागवत धर्म मानतो.

एकनाथ भागवत धर्माचे आहेत. कोल्हाटीण जमिनीत वेळू रोवते. त्यावर कसरतीचे खेळ करते. या आदिमायारुप कोल्हाटीणने प्रपंचरुपी वेळू रोवला आहे. त्यावर ती जीव, प्रपंच, ईश्वर आणि परमात्मा या चार मूल्यांचा खेळ मांडते. महानुभावांनीही ही चार मूल्ये मानली आहे. फक्त ईश्वराऐवजी ते देवता हे मूल्ये मानतात. ब्रम्हा, विष्णू ही आदिमायेचीच लेकरे आहेत. आणि म्हणून ब्रम्हा, विष्णूही या आदिमायेच्या पाया पडत असतात. या कोल्हाटीणीचा कोल्हाटी म्हणजे निर्गुण असलेला परमेश्वर होय. तो सोहमृ शब्दाचा ढोल वाजवत असतो. चला, आपण हा खेळ पाहायचा तर चैतन्यरुपी दृष्टीने पाहू या. ही कोल्हाटीण स्वर्गाहाही भारी होईल अशी उडी घेत असते. ती आपल्या अगाध मायेने स्वर्गाची दारे व खिडक्या उघडते. एकनाथ महाराज

तिच्या लीळांना न भुलता सगुण परमेश्वराची लीळा कशी पाहावी याचे समलोचना या 'कोल्हाटीण' रुपकाव्दारे समाजापुढे मांडतात.

दादला :

मला दादला नको ग बाई । मला नवरा नको ग बाई ।।
मोडकेसे घर तुटकेसे छप्पर। देवाला देवघर नाही।
मला दादला नको ग बाई ।घ।।
फाटकेच लुगड तुटकीशी चोळी। शिवायला दोरा नाही।ह्म।।
जोंधळयाची भाकर अंबाडीची भाजी। वर तेलाची धार नाही ।fi।।
मोडका पलंग तुटकी नेवार। नरम बिछाना नाही।।र्ं।।
सुरतीचे मोती गुळयाचे सोने। राज्यात लेणे नाही ।ह्व।।
एका जनार्दनी समरस झाले। तो रस येथे नाही ।।ˆ।।

दादला म्हणजे नवरा. ज्याच्या सान्निध्यात स्त्रीला सुख मिळते असा नवरा तिला हवा असतो. ज्याच्या मुळे तिला सुख मिळत नसेल तो नवरा तिला नको असतो. हा सामान्य व्यवहारातला सिध्दांत आहे. तोच सिध्दांत अध्यात्म क्षेत्रातही लागू पडतो. नाथांनी हे या भारुडातून रुपकाव्दारे मांडले आहे. या भारुडातला वाच्यार्थ सहजपणे कळतो. म्हणून श्रोत्यांना किंवा वाचकांना तो मनोरंजक वाटतो. पण त्यातील रुपकार्थ आध्यात्मिक असल्याने तो उलगडणे सामान्य माणसाकरीता एक अवघड गोष्ट आहे.

प्रस्तुत भारुडात एक स्त्री आपल्या मैत्रिणीला सांगत आहे की याचे घर मोडके आहे, घराचे छप्पर तुटके आहे आणि याच्या घरात देवाचे देवघरही नाही, म्हणून मला हा नवरा नको. रुपकार्थ असा – ही स्त्री म्हणजे सात्विक बुध्दी. दादला म्हणजे अविवेक. त्याचं घर म्हणजे पार्थिव देह, आणि तोही अविद्येच्या छप्पराने झाकलेला. वास्तविक भक्तीभाव हाच माझा देव आहे. त्या भक्तिभावालाच या घरात थारा नाही. म्हणून मला 'अविचारी'दादला नको.

लौकिक जीवनात ज्या नव–याच्या घरी फाटके लुगडे नेसावे लागते, चोळीही फाटकीच घालावी लागते आणि ती शिवण्यासाठी दोरा देखील नसतो असा नवरा स्त्रीला कधीच नको असतो. याचा पारमार्थिक रुपकात्मक अर्थ असा – फाटके लुगडे म्हणजे भ्रांती. फाटकी चोळी म्हणजे दु:खदायक कुबुध्दी, आणि दोरा म्हणजे यम नियमांचे बंधन. या रुपकाचा सरळ अर्थ असा की जेथे भ्रांती आहे, दु:खदायक कुबुध्दी आहे आणि यमनियमांचे बंधन नाही अशा ठिकाणी राहणे सात्विक बुध्दीला आवडत नाही.

लौकिक जीवनात ज्या घरी फक्त जोंधळयाची भाकर आणि अंबाडीची भाजीच खायला मिळते आणि त्यावर ल्यायला तेल सुध्दा नसते अशा दारिद्री घरी स्त्रीला राहणे आवडत नाही. याचा आध्यात्मिक रुपकात्मक अर्थ असा– जोंधळयाची भाकर म्हणजे व्दैताचे कोरडे अन्न, अंबाडीची भाजी म्हणजे तमोगुण आणि तेलाची धार म्हणजे भावनाचा स्नेह. या रुपकाचा सरळ अर्थ असा– जेथे व्दैत आहे, तमोगुणचे प्राबल्य आहे आणि जेथे भक्तीचा स्नेह नाही तेथे राहणे सात्विक बुध्दीला आवडत नाही.

लौकिक जीवनात झोपयचा पलंग मोडका आहे. त्याची नेवारही तुटकी आहे आणि त्यावर नरम बिछानाही नाही ते घर स्त्रीला आवडत नाही. याचा आध्यात्मिक रुपकात्मक अर्थ असा – मोडका पलंग म्हणजे विषय – सुखाची आवड, तुटकी नेवार म्हणजे नाशवंत गोष्टींचा मोह, नरम बिछाना म्हणजे शांती. या



Scanned with OKEN Scanner

ISSN : 2348-7143
October-2018

आध्यात्मिक रुपकाचा सरळ अर्थ असा की जेथे विषयसुखाची आवड आहे, नाशवंत गोष्टींचा मोह आणि शांतीचा लवलेश नाही अशा ठिकाणी राहणे सात्विक बुध्दीला रुचत नाही.

स्त्रियांना सोन्यामोत्याचे अलंकार आवडतात. पण जेथे उत्तम मोत्यांचे व सोन्याचे अलंकार ल्यायला मिळत नाही तेथे लौकिक जीवनात स्त्रीला दागिने घालण्याचा आनंद मिळत नाही. याचा आध्यात्मिक अर्थ असा की संसारातील सोने मोती हे खरे अलंकार नव्हेत. ज्ञान हा खरा अलंकार होय. कारण ज्ञानामुळेच मनुष्यदेहाला खरी शोभा येते. म्हणून जेथे ज्ञान नाही तेथे राहणे सात्विक बुध्दीला आवडत नाही.

सात्विक बुध्दी म्हणते की आता मी परमात्मा नव-याशी समरस झाले आहे, एकरुप झाले आहे. मी व माझा पती यात भेदच उरला नाही.

एकूण, खरे सुख प्रपंचात मिळत नसून परमेश्वरात मिळते, परमेश्वराशी एकरुप होण्यात मिळते असे अद्वैत तत्वज्ञान यात मांडले आहे.

विंचू :

विंचू चावला वृश्चिक चावला। कामक्रोध विंचू चावला।।
तम घाम अंगासी आला।धृ।।
पंचप्राण व्याकुळ झाला। त्याने माझा प्राण चालिला।।
सर्वांगाचा दाह झाला।।१।।
मनुष्य इंगळी अति दारुण। मग नांगा मारिला तिने।।
सर्वांगी वेदना जाण। त्या इंगळीची ।।२।।
हया विंचवाला उतारा। तमोगुण मागे सारा।।
सत्वगुण लावा अंगारा। विंचू इंगळी उतरे झरझरा ।।३।।
सत्व उतारा देऊन। अवघा सारिला तमोगुण ।।
किंचित राहिली फुणफुण। शांत केली जनार्दने।।४।।

नाथांनी स्वतःच हे रुपक स्पष्ट केले आहे. कामक्रोध हे विकार म्हणजे विंचू होते. त्यांनी नांगी मारली की सर्वांगाची लाही लाही होते. या विंचवाच्या विषाचा उतारा म्हणजे सत्वगुण होय. त्यामुळे सर्व तमोगुण मागे सरतात. नाथांनी हा उतारा देऊन सर्व तमोगुण मागे सारला. जी काही थोडी कुणकुण उरली होती ती गुरु जनार्दनांनी दूर केली. शेवटच्या चरणातून गुरुमाहात्म्याचेही चित्र उमटले आहे.

संत एकनाथांच्या भारुडांचा विचार करता ना. वि. बडवे म्हणतात, की ''योग, ज्ञान, भक्ती व स्वानुभव याच भूमिकेतून नाथमहाराजांनी ही रुपके लिहिली असल्यामुळे त्यांच्या मनातील गुढार्थ सहाजासहजी उलघडणे कठीणच आहे.'' जीव, जगत, ईश्वर आणि परमात्मा यांच्या अन्योन्य संबंधाचा विचार ज्याप्रमाणे इतर तत्वज्ञान्यांनी केला त्याचप्रमाणे नाथमहाराजांनी आपली अनुभवयुक्त विचारसरणी दर्शित केली आहे.''[२]

'''एकनाथी भारुड' हे बरेच मोठे आहे. ही बहुतेक कविता उपरोधात्मक आहे.'' ''धार्मिक व सामाजिक बाबतीतील काही अनिष्ट प्रकारावर नाथांनी ताशेरा झाडला आहे. मूर्तिपूजा, हिंसा, कर्मठपणाचे ढोंग, इत्यादींचा त्यांनी कडक शब्दांत निषेध केला आहे. हल्लीचे सुधारक, एकनाथ हा पहिला सुधारक होय असे म्हणतात, याचे कारण हेच होय.''[३]

डॉ. प्रकाश मेदककर व डॉ. भास्कर शेळके म्हणतात, ''शब्दांना वस्तुनिष्ठा असा वाच्यार्थ असतो. कवितेतील शब्दांच्या ठिकाणी रुपक, प्रतिमा, प्रतीक, इत्यादी घटकांमुळे वाच्यार्थाला छेद देऊन

ISSN : 2348-7143
October-2018

वाच्यार्थापलिकडचा अधिक अर्थ सूचित करण्यासाठी क्षमता प्राप्त होते. अर्थाला व्यंग्यार्थ असे म्हणतात कवितेतील सूचितार्थ आशयाला प्रतीकात्मक पातळीवर नेत असतो. या प्रतीकात्मक पातळीमुळेच कवितेच्या एकात्म, संघटित अशा काव्यार्थाची म्हणजे व्यंग्यार्थाची प्रतीती येते.''[4] संत एकनाथांच्या भारुडातून अशा व्यंग्यार्थाची प्रतीती विशेषत्वाने येते.

एकूण संत एकनाथांनी ५२५ विषयावर ३०० भारूडे रचली असुन त्यांच्या भारूडातील अध्यात्मवाद हे महत्वाचे अंग संत साहित्यात लक्षणीय भर घालणारे आहे. त्यांच्या भारूडामधुन रूपकता, उपरोध, भक्ती, विरक्ती, परमेश्वर, प्राणी, मनुष्यविकार, जीव, जगत, आत्मा, आदिमाया अशा विविध विषययाची व्याप्ती दिसुन येते. संत एकनाथांच्या भारूडांच्या विषयाची विविधता जशी आहे तसेच त्यामध्ये तत्वचिंतन आहे. सामान्य जनांना त्यांनी भारूडाच्या रूपाने समाजावून सांगितले आहे. काही भारूडांमधून प्रबोधन आहे. तसेच जाती व्यवस्था, व्यवसाय, नातेसंबंध, शारीरीक अपंगता, मानवाच्या विविधप्रवृती, पशु–प्राण्याविषयी, सण व उत्सव, सांसारिक जीवन अशा विविध विषयामधून मनोरंजनाबरोबर त्यांनी प्रबोधनही केले आहे. हे एकनाथांचे वेगळेपण मराठी साहित्यातील अनमोल देणे आहे.

संदर्भ टिपा :

1. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मण शास्त्री जोषी (संपा.) – मराठी विश्वकोष खंड २ म. रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई 1976 (पृष्ठ क्र. 999)
2. ना. वि. बडवे – एकनाथ महाराजांची भारुडे, एकनाथ संषोधन मंदिर प्रकाशन, औरंगाबाद १९६८. (पृष्ठ क्र. ४)
3. ज. र. आजगावकर – प्राचीन मराठी संतकवी, प्रकाशक– कमला भास्कर आजगावकर, दादर, मुंबई १९५७. (पृष्ठ क्र. ३२६)
4. डॉ. नागनाथ कोतापल्ले (संपा.) – कविता, यशवंतराव चव्हाण मुक्त विदयापीठ नाशिक, पुनर्मुद्रण २००८.
(पृष्ठ क्र. १३)

Scanned with OKEN Scanner